आर.एन.आय.-१५५७/५७, रजि. नं. पी. एन.सी.डब्ल्यू./डी-१६६/२०१२-२०१४.

Smart करबचत

# करबचतीची अतिरिक्त संधी : इन्फ्रास्ट्रक्चर बाँड्स



राहुल मंत्री

posiview.response@esakal.com

गुंतवणुकीचा निर्णय हा कायमच जोखीम आणि संभाव्य परतावा यांच्या हिंदोळ्यावर स्वार असतो. गुंतवणुकीचा सरधोपट नियम असे सांगतो, की जेवढी जोखीम जास्त तेवढा परतावा देखील जास्त! परंतु जसा प्रत्येक नियमाला काहीतरी अपवाद असतोच, तसे या नियमालादेखील काही अपवाद अर्थातच आहेत. इन्फ्रास्ट्रक्चर बाँड्समधील गुंतवणुकीची संधी ही एक अशा प्रकारची गुंतवणूक आहे, की जी अत्यंत कमी जोखमीमध्ये अत्यंत उत्तम परतावा देऊन जाते. मागील वर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पाचा एक भाग म्हणून केंद्रीय अर्थमंत्र्यांनी ८० सीसीएफ कलमान्वये देण्यात येणाऱ्या वजावटीस आणखी वर्षभराची वाढ दिली. या कलमानुसार, सरकारने नमूद करून दिलेल्या ठराविक कंपन्यांच्या इन्फ्रास्ट्रक्टर बाँड्समध्ये २० हजार रुपयांची गुंतवणूक करणाऱ्यांना ८० सीच्या अंतर्गत मिळणाऱ्या प्रारंभिक करवजावटीच्या खेरीज अतिरिक्त वजावट लागू करण्यात आली आहे.

## बाँड्सची वैशिष्ट्ये

या बाँड्सना पाच वर्षे मुदतीचे गुंतवणुकीचे बंधन असते (लॉक इन पीरियड). पाच वर्षांनंतर गुंतवणूकदार एक तर बाँड्स शेअर बाजारात विकू शकतात किंवा पर्याय उपलब्ध असल्यास मूळ कंपनीस परत करू शकतात. आयडीएफसी, एल अँड टी फायनान्स, आयएफसीआय, आरईसी, पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन आदी कंपन्यांनी जारी केलेल्या इन्फ्रास्ट्रक्चर बाँड्समध्ये गुंतवणूक करणाऱ्यांना अतिरिक्त कर वजावटीचा लाभ मिळतो.

गेल्या आर्थिक वर्षात या सर्व कंपन्यांनी साधारणतः ८ टक्के ते ८.७५ टक्के एवढ्या कूपन रेटने हे बाँड्स बाजारात सादर केले. यंदाच्या आर्थिक वर्षात आयडीएफसी आणि एल अँड टी फायनान्स यांनी आपल्या अनुक्रमे एएए आणि एए प्लस मानांकनाचे बाँड्स ९ टक्के दराने बाजारात आणले. एसआरईआय इन्फ्रा फायनान्सने आपल्या एए मानांकनाच्या बाँड्ससाठी सर्वाधिक ९.१५ टक्के दर जाहीर केला. दहा वर्षे मुदतीच्या सरकारी रोख्यांवरील यील्ड घसरल्यामुळे आयडीएफसी आणि एल अँड टीने आपल्या बाँड्सवरील कूपन रेट कमी करून ८.७ टक्क्यांवर आणला.

बँकेच्या मुदत ठेवी, एनसीडी आदींच्या तुलनेत बाँड्सचा ९ टक्के दर कमी असला, तरी या बाँड्सची वैशिष्ट्ये आणि करबचतीचा फायदा यांचा सखोल विचार केला, तर यामधून प्रत्यक्षात १८.७६ टक्क्यांचा अंतिम अप्रत्यक्ष परतावा (आयआरआर) मिळतो, हे आपल्या लक्षात येईल. सोबत दिलेल्या तक्त्यामध्ये अनुक्रमे ३० टक्के, २० टक्के आणि १० टक्के करभरणीच्या पट्ट्यात येणाऱ्या गुंतवणूकदारांना बाँड्समुळे मुदतपूर्तीच्या वेळी नेमका किती परतावा (मॅच्युरिटी यील्ड) मिळू शकतो, ते दाखविले आहे.

### सध्या उपलब्ध असलेले इन्फ्रास्ट्रक्चर बाँड

**आर्थिक वर्षाच्या शेवटच्या टप्प्यात आयडीएफसी तसेच पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन (पीएफसी) या कंपन्यांचे दीर्घकालीन इन्फ्रास्ट्रक्चर बाँड बाजारात उपलब्ध आहेत. त्याचा गुंतवणूकदार फायदा घेऊ शकतात.**

**९ टक्के दराच्या इन्फ्रास्ट्रक्चर बाँड्सवर पाच वर्षे मुदतीनंतर मिळणारा परतावा**

| | ३०% करपट्टा | २०% करपट्टा | १०% करपट्टा |
|---|---|---|---|
| गुंतविलेली रक्कम | २०००० | २०००० | २०००० |
| करबचतीचा लाभ | ६०००* | ४०००* | २०००* |
| कर वजा जाता बाँड्सची किंमत | १४००० | १६००० | १८००० |
| मिळणारे वार्षिक व्याज | १८०० | १८०० | १८०० |
| कर वजा जाता मिळणारे व्याज | १२६०* | १४४०* | १६२०* |
| मुदतपूर्तीला मिळणारा करपूर्व परतावा | १८.७६% | १४.९६% | ११.७६% |
| मुदतपूर्तीला मिळणारा करपश्चात परतावा | १५.३२% | १२.८७% | १०.७९% |

*आकडेवारीच्या सोयीसाठी प्राप्तिकरावरील अधिभार या मोजणीमध्ये वगळण्यात आला आहे.

## ९ टक्के रेटमधून १८.७२ टक्के आयआरआर

या बाँड्समध्ये गुंतवणूक करणाऱ्याला त्या वर्षासाठी प्राप्तिकरातून अतिरिक्त वजावट मिळते. उदाहरणार्थ, जर एखादा गुंतवणूकदार ३० टक्के करपट्ट्यामध्ये येत असेल तर त्याला बाँड्समधील २० हजार रुपयांच्या गुंतवणुकीसाठी ६ हजार रुपयांची कर वजावट मिळते. 'बचत हे एक प्रकारचे उत्पन्नच असते' या न्यायाने कर वजावट गृहीत धरता हे बाँड्स गुंतवणूकदारांना १४ हजार रुपयांनाच मिळाले, असे होते. तसेच गुंतवणूकदाराला पाच वर्षांपर्यंत दर वर्षी १८०० रुपयांचे व्याज मिळत राहते. मुदतपूर्तीच्या वेळी बाँड्सधारकाला हे बाँड्स विकून त्याने मूळ गुंतविलेले २० हजार परत मिळू शकतात. त्यामुळे या साऱ्याचा विचार करता मुदतपूर्तीच्या वेळी गुंतवणूकदाराला प्रत्यक्षात १८.७६ टक्के परतावा मिळतो, हे आपल्या लक्षात येईल. त्यामधून कर वजा केला तरीही प्रत्यक्ष परतावा १५.३२ टक्के एवढा मिळतोच!

बहुतांश इन्फ्रास्ट्रक्चर बाँड्स हे उच्च पतमानांकनाचे असल्याने व्याज न मिळण्याची शक्यता जवळपास उरत नाही. तसेच गुंतविलेले मुद्दल सुरक्षित राहण्याची शक्यतादेखील खूप जास्त असते. त्यामुळे चांगल्या परताव्याच्या शोधात असलेल्या गुंतवणूकदारांनी सुरक्षित गुंतवणुकीचा पर्याय म्हणून या बाँड्समध्ये गुंतवणूक करण्याची संधी गमावता कामा नये. या बाँड्समध्ये गुंतवणूक करण्यापूर्वी गुंतवणूकदारांनी आपली नेमकी करपात्रता किती आहे, याची खात्री करून मगच निर्णय घ्यावा. जर तुमची करपात्रता अगदी किरकोळ, नगण्य असेल तर या बाँड्समध्ये गुंतवणूक करण्यात काहीही अर्थ नाही. तसेच कोणत्याही बाँड्समध्ये गुंतवणूक करण्यापूर्वी गुंतवणूकदारांनी बाजारात उपलब्ध असलेल्या विविध बाँड्सच्या कूपन रेटचा तुलनात्मक अभ्यास जरूर करावा आणि मगच निर्णय घेणे श्रेयस्कर!

(लेखक सर्टिफाईड फायनान्शियल प्लॅनर - सीएफपी आहे.)